# इतिवृत्तम्

सत्र - 2019 - 20

FOR EDUCATIONAL USE

Page No
Date

ARTS & COMMERCE COLLEGE
Tal - Khatav
Dist - Satara
(M.S.)

Page No
Date

गट क्र ३

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडुज

## इतिहास विभाग

FOR EDUCATIONAL USE

Page No
Date

# विषय :-

पेपर क्र 13
मध्ययुगीन कालीन व्यापार व
उद्योगधंदे

मार्गदर्शक
प्रा घार्गे. आर. एम
प्रा गुजर व्ही. जी

★ संकलक ★
पटेल करिश्मा ऐनाज

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

Topic

Date / /20
Page:

# विद्यार्थी यादी व रोल नं

| अ.नु | विद्यार्थ्यांची नावे | रोल नं | सही |
|---|---|---|---|
| 1 | मांडवे धनश्री नानासो | 466 | D.N. Mamdave |
| 2 | मोरे काजल निवृत्ती | 467 | Kmore |
| 3 | पटेल करिश्मा रेनाज | 468 | K.A.Patel |
| 4 | पवार अश्विनी अशोक | 469 | A.A. Pawar |
| 5 | पवार प्रतिभा बापुराव | 470 | Pawar |
| 6 | पवार प्रियंका तानाजी | 471 | P.T. Pawar |
| 7 | पवार प्रतीक बाळासो | 472 | P.B. pawar |

colurs® GOLD
PPFG_08
Flowers

Scanned with CamScanner

Topic

Date / /20

Page:

# ★ अनुक्रमाणिका ★

| अ.नु | विषयसुची |
| --- | --- |
| 1 | प्रस्तावना |
| 2 | उद्दीष्ट्ये |
| 3 | गृहितके |
| 4 | मध्ययुगीन कालीन व्यापार |
| 5 | व उद्योगधंदे |
| 6 | आभार |

colurs® GOLD Flowers

Scanned with CamScanner

Topic :                                        Page :
                                               Date :

# प्रस्तावना

भारताच्या इतिहासात गुप्त सत्तेनंतर विस्तारीत राजसत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न मध्ययुगीन काळात झाला. तुर्की आक्रमनामुळे भारताच्या राजकीय सामाजिक व आर्थिक जीवनावर दुरगामी परिणाम झाला - दिल्लीच्या ठिकाणी आपली राजधानी निर्माण करुन तुर्की सुलतानांनी मुघल बादशहांनी विशाल साम्राज्य निर्माण केले. विशाल साम्राज्याची निर्मीती झाल्यामुळे देशाच्या आर्थिक जीवनामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आले, अल्लाउद्दीन खिल्जी फिरोजशहा तुघलक यांनी शेतीकडे विशेष लक्ष दिल्यामुळे शेती उत्पादनात अधिक भर पडली देशात विपुल प्रमाणात धान्य उपलब्ध झाले, शेती बरोबर अनेक कुटीर उद्योगाचा उदय झाला. मध्ययुगीन भारताची अर्थव्यवस्था स्वयंपुर्ण असल्यामुळे लोकांच्या गरजा त्या त्या गावात भागविल्या जात असत मुघल काळात आर्थिक बाबीमध्ये व मुघलांचे राज्य स्वयंपुर्ण होते, उद्योगधंदे, उत्पादने, व्यापारी उलाढाल मधील शहरांची उपयुक्तता बाजारपेठांचे शहरांना आलेले स्वरुप महत्वाचे होते. या काळातील व्यापार भारतांतर्गत व विदेशी मोठ्या प्रमाणातवर सुरु होता. अंतर्गत व परकीय व्यापारामुळे अर्थव्यवस्था विकसीत होण्यास मदत झाली. भारतभर अशा उद्योगधंद्याची संख्या फार मोठी होती.

# उद्दिष्टये

1 आपणास या प्रकल्पामुळे सुलतानशाही व मुघलशाही उद्योगधंदे व व्यापार कसा झाला ते पहावयास मिळते.

2 आपणास उद्योगधंदे या प्रकल्पामुळे मध्ययुगातील उद्योगधंदे व व्यापाराचा इतिहास समजतो.

3 मध्ययुगीन उद्योगधंदे व व्यापारी इतिहासात उद्योग व व्यापारी कशा पद्धतीत अस्तीत्वात होता.

4 मध्ययुगीन उद्योगधंदे व व्यापारी इतिहासात समाजरचनेत बदल घडून आले.

5 आपणास या प्रकल्पातुन मध्ययुगीन उद्योगधंदे व व्यापार कसा घडून आला ते समजते.

Topic :
Page :
Date :
colurs
Flowers
GOLD
PPCG_015
Scanned with CamScanner

Topic : 

Page : 
Date : 

# गृहितके

1 आपणास या प्रकल्पामधुन सर्व इतिहास कालीन माहिती मिळते.

2 आपणास या प्रकल्पामधुन मध्ययुगीन उद्योगधंदे व व्यापार यांच्या संबंधीचे ज्ञान मिळते,

3 इतिहासात असे प्रकल्प केल्याने इतिहासाची माहिती सर्वांना मिळते.

4 आपणास इतिहास या विषयाने मध्ययुगीन भारताच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक इतिहास या विषयी इत्यंभूत माहिती मिळते.

5 आपणास या प्रकल्पामधुन इतिहास अभ्यासाची रुची निर्माण होते.

Scanned with CamScanner

# उद्योगधंदे

## हस्त उद्योग :-

या देशाला हस्तउद्योगाची शेकडो वर्षांची परंपरा आहे. कुशल कारागीरांनी तयार केलेल्या उत्पादनाला फार मोठे महत्त्व होते. या रूपाने देश समृद्ध झाला. मध्ययुगात मुघल काळातीलही तो वारसा जपला होता, परंतु ब्रिटीशांच्या आगमनाने हे मोठे आर्थिक संकट ठरले. ब्रिटीशांनी त्यांच्या राजवटीत सत्तेचा दुरुपयोग करून देशाचा समृद्ध वारसा नष्ट केला.

भारतात चालणारे हस्तोउद्योग आणि उत्पादन केली जाणारी शहरे याची माहिती पुढील प्रमाणे.

| अ.नं | उत्पादनाचे प्रकार | उत्पादनाचे ठिकाणे |
|---|---|---|
| 1 | मलमल कापड | ढाका चंदेरी येवला सोनारगाव |
| 2 | रेशमी कापड | बनारस आग्रा पैठण |
| 3 | चिटाचे कापड | दिल्ली लखनौ सरहिंद |
| 4 | संगमरवरी दगडांचे काम | आग्रा फतेपुर सिक्री |
| 5 | चंदनी लाकडाचे काम | मलबार |
| 6 | धातूची भांडी तयार | बनारस नाशिक |
| 7 | हत्यारे | कच्छ सिंध बऱ्हाणपुर |
| 8 | सुगंधी द्रव्ये | दिल्ली कनोज जौनपुर |
| 9 | भरतकाम | सियालकोट गुजरात शहरे |
| 10 | झिलईदार भांडी | आसाम जयपुर बनारस |

Topic :

Page :

Date :

# उद्योगधंदे

प्राचीन काळापासुन भारत देश कृषी प्रधान होता, शेती बरोबर विविध उद्योगधंदे चालत असत त्या पैकी कापड व्यवसाय जगभर प्रसिद्ध होता.

## कापड उद्योग :-

मध्ययुगीन भारतातील सर्वात मोठा व्यवसाय कापड उद्योग होता. विदेशी प्रवाशांचे वृत्तांत ईस्ट इंडिया कंपनीच्या नोंदीवरुन भारतात 150 प्रकारचे कापड तयार केले जात होते. मुघलकाळात 50 प्रकारचे कापड तयार होत असे. यावरुन देशात कापड व्यवसाय भरभराटीस आलेला दिसुन येतो मुघल काळात हा व्यवसाय अधिक विकसीत झाला.

1 शासनाचे जकात विषयक धोरण अनुकूल होते.
2 व्यापारी केंद्राचा विकास
3 रस्ते धर्मशाळा पाणपोया. व्यापाराची साधने इ मध्ये सुधारणा केल्या.
4 सागरी बंदरात सुधारणा केल्या
5 व्यापार वाहतुक यात सुरक्षितता मिळाली.
6 युरोपीय व्यापारी या काळात मोठ्या संख्येने येत राहीले शासन त्यांना मदत करीत असे वरील कारणामुळे मध्ययुगात कापड उद्योगाचा विकास झालेला दिसतो.

Flowers

GOLD

Topic :

Page

Date

## कापड तयार करण्याची पद्धती

भारतात कापड तयार करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती होत्या सुती कापडासाठी कापुस आवश्यक होता. कापुस स्वच्छ करून चरख्यावर धागे तयार करत त्यापासुन मागावर कापड विणले जाई. चिना लिंबु खार गंधक साबणाच्या मिश्रणाने कापड धुतले जाई नंतर त्यास रंग देत अशा रितीने सुती कापड तयार होऊ. रेशीम पासुन रेशीम कापड तयार करत.

## कापड उद्योगाची केंद्रे :-

कापड उद्योग हा मध्ययुगीन भारतातील सर्वात महत्वाचा उद्योग सलतनतकाळात रेशमी कापड बनवण्याचे अनेक कारखाने उभे केले होते. मुहमंद तुघलकाने जरीची वस्त्रे बनवण्यासाठी ५ हजार कारागीर नियुक्त केले. त्याच्या काळात ढाकाची मलमल जगप्रसिद्ध होते. देवगिरी हे वस्त्र उद्योगाचे प्रमुख केंद्र होते.

## रंग उद्योग

लखनौमध्ये नाळेचे उत्पादन होई. त्यापासुन लाल रंग तयार होत असे पक्का रंग तयार करण्यासाठी लिंबु, तुरटी, चुना, हिरडे बेहडे फेरस सल्फेट इ वापर व रंग वधकामामध्ये घटक म्हणुन केला जाई.

colurs

Flowers

GOLD

Scanned with CamScanner

Topic : Page Date

अलाहाबाद, लाहोर, दिल्ली आग्रा व अवध येथे कुसुंबा पासून भिवका रंग तयार होई. लाल रंग ही तयार करण्यात येत असे. लाहोर अलाहाबाद येथे हळदीचे पीक घेतले जात त्यामुळ काथ मेदी तपकिरी रंग तर बेहडा तुरटी यापासून काळा रंग बनवत

## धातु उद्योग :-

धातुकाम हा प्राचीन व्यवसाय असुन भारतामध्ये या व्यवसायाला प्रदीर्घ परंपरा लाभली होती. भारतात धातु उद्योग खालील प्रमाणे होते

## लोखंड :-

गुजरात, गोवळकोंडा, सियालकोट मुलतान लाहोर, मेवाड. अजमेर कालिंजर हे लोखंडी आणि पोलादी वस्तुच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते. पंजाबमध्ये कुलुपांचे उत्पादन केले जात होते. बिकानेर व मेवाड येथे लष्करी सामग्री व शस्त्रास्त्रे तयार केली जात शेतीला लागणारी अवजारे खेडेगावात बनवली जात महाराष्ट्रात नागोठाणे पुणे येथे तोफा तयार केल्या जात

## तांबे व पितळ -

नाणी, मुर्ती, इमारतीचे घुमट किल्ल्याच्या भिंती बंदुका. तोफा भांडी बनवण्यासाठी तांब्याचा वापर केला जाई. या वस्तु तयार करणाऱ्या कुशल

colurs Flowers GOLD PPCG 015

Scanned with CamScanner

कारागिरांचा उद्योग मोठा स्वरूपात असे धातु शुद्ध करणे

## सोने-चांदी :—

सोन्याचा उद्योग प्रामुख्याने कर्नाटकात अस्तित्वात होता. मस्की हट्टी बिदनूर व कोलार या भागात सोन्याच्या खाणी होत्या. सोन्यापासुन नाणी, मूर्ती, भांडी दागदागिने बनवित, विजय-नगरच्या साम्राज्याचे सिंहासन सोने, हिरे मोत्यांनी जडविलेले होते. अशी नोंद इराणाचा अब्दुल रझाक याने आपल्या प्रवास वर्णनात केली आहे. सोन्याप्रमाणेच चांदीचाही वापर करून अनेक वस्तु बनविल्या जात असत. सोने-चांदी यांच्या कारागिरीची प्रख्यात केंद्रे दिल्ली, आग्रा, बनारस आसाम आणि गुजरात येथे होती.

## हिरे रत्ने :—

दक्षिण भारतात उच्च प्रतीचे हिरे रत्ने यांच्या खाणी होत्या. राजे व श्रीमंत लोक रत्नजडीत हिरे माणके मोती यांनी जडविलेले दागिने घालीत असत. बुंदेलखंड चंदेरी हिऱ्याच्या खाणी होत्या. गोवळकोंडा राज्यातही हिरे मिळत असे. मध्ययुगात जडजवाहिरीचा उद्योग बऱ्याच मोठ्या प्रमाणात चालत होता.

Topic :

Page :
Date :

## मीठ उदयोग :—

कोकण किनारपट्टीवर मीठाचा उद्योग भरभराटीस आला होता. मीठ उद्योगास शासनाची परवानगी लागे. द. भारतात मलबार गुंटूर दक्षिण अर्काट त्रावणकोर म्हैसूर आणि चिंगलप या ठिकाणी मीठ तयार करण्याचे काम चालत असे. बलवारी या ठिकाणी उप्पार जमातीचे लोक मीठ तयार करण्याचा व्यवसाय करीत इ.स १६३८ मध्ये आग्रा येथे मीठाची किंमत 1 रु = 17 मन तर सांभार येथे 1 रु = ५ मण भावाने विकले जात

## साखर व्यवसाय :—

अगदी प्राचीन काळापासुन भारतात ऊस उत्पादन व त्यापासुन गुळ साखरेची निर्मिती हा उद्योग केला जात होता. बंगालमध्ये साखरेचे उत्पादन प्रमाणात होत असे. साखर परदेशी निर्यात केली जात असे. द. भारतात पांढरी शुभ्र साखर ताडाची साखर (ताडगुळ) अशा दोन प्रकारची साखर तयार केली जात होती नारळाच्या रसापासुन जाड लाल रंगाची साखर तयार होत अशा साखरेला जॅगरी म्हणत असत ही साखर परदेशात निर्यात केली जात असत भटकळ हे व्यापारी केंद्र साखर निर्यातीसाठी प्रसिद्ध होते लाहोर दिल्ली आग्रा बनारस लखनौ जयपुर अलाहाबाद या भागात साखर उत्पादन उद्योग होत

## जहाज बांधणी :—

हा उद्योग प्रामुख्याने कालिकत कोचीन मालदीव बेटे येथे भरभराटीस आला होता लढाया आणि माल वाहतुकीची जहाजे बांधली जात. बार्बोसा याने मालदीव बेटावरील जहाज बांधणीचा उल्लेख केला आहे. इब्न बतुता यांनी ही जहाज बांधणी उद्योगाची माहिती प्रवास वर्णनात दिली आहे. महाराष्ट्रात वसई, ठाणे कल्याण भिवंडी अलिबाग येथे जहाज बांधणीचा व्यवसाय चालत असे.

## नारळ व त्याच्याशी संबंधित उद्योग :—

अब्दुल रज्जाक या विदेशी प्रवाशाने या उद्योगाचा उल्लेख केला आहे. नारळाच्या झाडापासुन, फळे, तेल काथ्याचा धागा, दोर, नाडी, गुळ मद्यार्क चटया बांधकामासाठी लाकुड इ वस्तु मिळत हा उद्योग समुद्र किनाऱ्यालगतच्या प्रदेशातील विविध गावातुन चालत असे.

## चर्म उद्योग :—

चामड्यापासुन घोड्याचे लगाम खोगीर, पादत्राणे, तलवारीचे म्यान पुस्तकांच्या बांधणीसाठी पाण्याच्या पखाली गोफन बैलांना बांधण्याचे पट्टे बनविण्याचा व्यवसाय सर्वत्र चाले

Page No
Date

## कागद उदयोग :—

मध्ययुगीन भारतातील कागद उदयोगाचे श्रेय समरकंदचे कारागिर आणि चिनी लोक यांना दिले जाते. प्रामुख्याने तुतीच्या झाडाचे धागे, ताग, अंबाडीचे धागे, कापडाच्या चिंध्या पासून, झाडांच्या सालीपासून कागद तयार केला जात असे, फर्मान लिहिणे, कुराण व इतर धार्मिक ग्रंथांच्या प्रती तयार करणे.

काचेचा उदयोग प्राचीन काळापासुन भारतीयांना माहित होता. काचेच्या वस्तु उच्चवर्णिय लोक वापरीत असत गुजरात, गोरखपूर, आग्रा, बिहार अहमदनगर ही काच उदयोगाची प्रमुख केंद्रे होती.

## इतर उदयोग :—

खाणी पासुन दगड काढून त्यावर कोरीव काम करणे, लाकडी फर्निचर, सुगंधी द्रव्ये, वेताच्या बांबूच्या वस्तु तयार करणे. हस्तीदंत वस्तु बनवणे. तेलबियापासुन खादय तेल बनविणे, मासेमारीचा उदयोग, खेळणी बनविणे या सारखे उदयोग स्थानिक स्वरूपाचे होते हे सर्व देशभर विखुरलेले होते. त्या त्या वस्तूंची गरज या उदयोगातुन पुर्ण केली जात असे.

वरील तपशीलावरून लक्षात येते मध्ययुगीन काळात विविध प्रकारचे उदयोगधंदे केले जात असून देशात आर्थिक बाबतीत समृद्धता होती.



Scanned with CamScanner

Page No
Date

# * व्यापार *

## मध्ययुगीन भारतातील अंतर्गत व्यापार

**प्रस्तावना :-** मध्ययुगात भारताच्या अंतर्गत व विदेशी व्यापार अत्यंत भरभराटीला आलेला होता. त्यामुळे भारताच्या समृद्धीमुळे सातत्याने भर पडत होती. या काळात संपूर्ण भारतात अंतर्गत व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे देशात तयार होणाऱ्या वस्तू व उत्पादने अभाव असणाऱ्या प्रदेशात पोहोचविल्या जात असत त्यासाठी खालील प्रमाणे व्यापारी मार्ग -

### * अंतर्गत व्यापाराचे प्रकार :-

#### ① समुद्र किनाऱ्याने चालणारा व्यापार :-

दक्षिण भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरातून अरबी समुद्र किंवा हिंदी महासागराद्वारे पश्चिमेकडील देशात माल निर्यात केला जाई. या पूर्वेकडील किनाऱ्यावरून उपसागराद्वारे पूर्वेकडील देशांशी आयात निर्यात होत असे. समुद्र किनारी अनेक बंदरे होती. त्या बंदराच्या साहाय्याने मोठा व्यापार चालत असे.

#### ② प्रमुख नद्यांतून केला जाणारा व्यापार :-

मध्ययुगात गंगा, यमुना, सिंधु, तापी या मोठ्या नद्यांच्याद्वारे माल वाहतुक केली जाई त्यासाठी शलबतांच्या सहाय्याने व्यापारी वस्तु बाजारपेठेमध्ये पाठविल्या जात असत. नद्यानुसार हा जलमार्ग खालील प्रमाणे होता.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

Page No
Date

## अ) सिंधू नदीचा मार्ग :—

सिंधु नदी ही भारतातील मोठी व महत्वाची नदी होती. तिच्या उपनद्यातुन मोठा व्यापार केला जाई. सिंध मुलतान व लाहोर इ. प्रदेशातील माल सिंधु नदीतुन विविध बाजार पेठेत पाठविला जात असे, तसेच नदीतुन बाहेरी बंदरा मार्फत ही माल पाठविला जात असे

## ब) गंगा यमुना मार्ग :—

उत्तर भारतातील गंगा ही विशाल नदी होती, चंबळ, शोण, घागरा या तिच्या उपनद्यातुन मोठा व्यापार चालत असे. दिल्ली, आग्रा, अलाहाबाद ते सोनारगांव ढाक्यापर्यंत इ अनेक औद्योगिक व व्यापारी केंद्रे विकसीत झाली होती,

## क) तापी नर्मदा नदीचा मार्ग :—

या नद्यातुन पश्चिम किनाऱ्याशी व्यापार चालत असे, उदा: खंबायत बंदरातून दक्षिणेकडे कोचीन पर्यंत व्यापार चालत असे, माळवा खानदेशामधील माल बऱ्हाणपूर उज्जैन इ व्यापारी केंद्रातुन नद्यामार्गे खंबायत पर्यंत जात असे.

## 3] बंगालचा त्रिभुज प्रदेश :—

या प्रदेशातुन व त्यातील विविध केंद्रामधुन व बंदरातुन केला जाणारा व्यापार हा गंगा व तिच्या उपनद्यातुन होणाऱ्या व्यापाराशी निगडीत होता देशांतर्गत व अनेक बाजारपेठेत व परदेशी माल या प्रदेशातुन निर्यात होत असे.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

Page No
Date

## ③ जमीन किंवा कुसकीच्या मार्गाने चालणारा व्यापार :—

संपूर्ण भारतात निरनिराळ्या औद्योगिक केंद्रांना, व्यापारी केंद्रांना आणि साम्राज्यातील बंदरांना जोडणाऱ्या रस्त्याचे जाळे पसरलेले होते. आग्रा ही दीर्घकाळ मुघल साम्राज्याची राजधानी असल्यामुळे आग्र्यातून निरनिराळ्या दिशांना पाच प्रमुख महामार्ग - आग्रा ते काबूल, आग्रा ते कंदहार, आग्रा ते खंबायत, आग्रा ते बऱ्हाणपुर आणि आग्रा ते सोनारगांव गेलेले होते. या महामार्गांना लहरी, खंबायत, सुरत सोनारगांव यासारखी विख्यात व्यापारी बंदरे जोडली होती. या महामार्गांना व परस्परांना जोडलेले होते.

## रस्त्यांची देखभाल व सोई :—

रस्त्यांची काळजी, दुरुस्ती करून रस्त्यांच्या दुतर्फा सावली देणारी झाडे लावली असत. ठराविक अंतरावर धर्मशाळा बांधलेल्या असत. व्यापारी प्रवासी लोकांची राहण्याची व्यवस्था व रक्षा संरक्षणाची व्यवस्था केलेली असे. रस्त्यावर ठराविक अंतरावर विहिरी खोदलेल्या होत्या.

## वाहतुकीची साधने :—

मध्ययुगीन भारतात व्यापारासाठी बैल व बैलगाडी, उंट ही महत्वाची साधने होती. प्रादेशिक गरजेनुसार प्राण्यांचा वापर होत असे. माळवा गुजरात येथे घोडे, उंट खेचरे वापरत. वरिष्ठ लोक हत्तींचा तर स्त्रियांसाठी डोलीचा वापर करीत. ओझी वाहणारे प्रत्यक्ष हमाल असत. व्यापारी तांडे समुदायाने व्यापारी कामे करीत असत.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

Page No
Date

## व्यापारी केंद्रे :—

मध्ययुगीन भारतात सुलतानांनी मुघल सम्राटांनी अनेक व्यापारी केंद्रे, बाजारपेठा, व्यापाऱ्यांना उत्तेजन देऊन व्यापार मोठ्या प्रमाणावर विकसीत करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे लाहोर व आग्रा ही व्यापारी केंद्रे विकसीत झाली. या केंद्रांना बाजारपेठा, शहरे, औद्योगिक केंद्रे म्हणूनही स्वरूप प्राप्त झाले. मुघल कालीन भारतात अनेक व्यापारी केंद्रांचा विकास व भरभराट झाली. ही व्यापारी केंद्रे नद्यांच्या संगमावर, जलमार्गावर, घाटांच्या ठिकाणी कच्चा माल जेथे उपलब्ध आहे तेथे निर्माण झाली.

| | |
|---|---|
| वायव्य प्रदेश | काबुल, कंदहार, मुलतान, लाहोर |
| सिंध प्रदेश | ठट्टा, भक्कर इ. |
| मध्यभाग | दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, जौनपुर |
| दक्षिण भाग | बऱ्हाणपुर, एलिचपूर, उज्जैन |
| ओरिसा | कटक, बालासोर |
| बंगाल | सोनारगाव, ढाका इ. |

याशिवाय द. भारतात विजयनगर, तंजावर, उदयगिरी, श्रीरंगपट्टनम, बिदर, गोवळकोंडा इ. तर महाराष्ट्रात कोल्हापूर, कराड, नाशिक, पैठण, देवगिरी, सोलापूर इ. बाजारपेठा प्रसिद्ध होत्या.

## मध्ययुगीन भारतातील महत्त्वाची [illegible]

**काबुल :—** भारत, इराण आणि [illegible] [illegible] काबुल हे अत्यंत महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. [illegible] [illegible] [illegible] [illegible] काबुलमध्ये [illegible]

FOR EDUCATIONAL USE

Page No
Date

येत असत व्यापार उद्योगाला चालना देण्यासाठी जहांगिरीने काबुल शहराची जकात माफ केली होती.

## लाहोर

काबूलप्रमाणे लाहोर हे एक मोठे व्यापारी केंद्र होते. अकबराच्या काळात या शहरातील व्यापारात लक्षणीय वाढ झाली होती. हत्यारे, पांढरे सुती कापड लोकर रेशीम यांचा भरभराटीस व्यवसाय आला होता.

## आग्रा

मुघल काळातील व्यापार व उद्योगाचे महत्वाचे केंद्र होते. यमुनेच्या जलमार्गावरील महत्वाचे व्यापारी ठाणे ह आग्र्यापासुन अनेक महामार्ग जात. भारतातील प्रमुख शहरांशी आग्रा जोडलेले होत आग्र्याला मुघल साम्राज्याचे हृदय म्हटले जाई.

## अहमदाबाद

इ.स 1410 मध्ये अहमदशहाने साबरमतीच्या काठावर अहमदाबाद या शहराची स्थापना केली होती. अहमदाबाद औद्योगिक व व्यापारी केंद्र असल्यामे कारखान्यातुन सुती आणि कागद हे तयार होत असे.

## बाजारभाव —

अल्लाउद्दीन खिलजीने वस्तूंचे भाव नियंत्रीत करण्याचा उपक्रम व उद्देश निसशय चांगला होता. बाजारातील वस्तूंच्या भावाचे नियंत्रण करण्यासाठी अल्लाउद्दीनने शहा-ए-मंडी हा अधिकारी नेमला होता.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

Page No
Date

# दक्षिण भारतातील व्यापार

दक्षिण भारतातील विजयनगर हे समृद्धशाली राज्य होते इ. स 1636 मध्ये विजयनगर च्या राज्याची स्थापना झाली

## किनाऱ्यावरील व्यापार

सागर किनाऱ्याने चालणारा व्यापार मलबारहुन लहान मलबारहून लहान गलबतांच्या सहाय्याने खंबायत सुरतला अनेक वस्तु पाठविल्या जात असत. उदा:- तांदुळ नारळ, खोबरेल तेल, गुळ इ. तर तेथुन विविध प्रकारचे कापड आणले जाई.

## नद्यांच्या मार्गे केला जाणारा व्यापार :-

दक्षिणेतील मुख्य नद्या व उपनद्यातुन व्यापार चालत असे. 1 गोदावरी नदी - पेनगंगा वर्धा या उपनद्या 2. कृष्णा - तुंगभद्रा भीमा या नद्या 3 कावेरी — या नद्यांच्या पात्रातून लहान गलबते, नावा, तराफे टोपलीच्या होड्या या साधनांच्या सहाय्याने व्यापार केला जा

## साधने व व्यापारी जमाती :-

बैल, बैलगाड्या, हत्ती, खेचरे घोडे पालख्या, डोली, म्हैशी गाढवांचा उपयोग व्यापारासाठी होत व्यापार करणाऱ्या अनेक जमाती होत्या, उदा. वीरनजीग शेट्टी मलबारीख बनिया, रेड्डी ब्राम्हण इ जमाती स्वतंत्रपणे व्यापार करीत होत्या।

## विदेशी व्यापार :-

विजयनगर राज्याच्या अंतर्गत आणि विदेशी व्यापार चांगलाच विकसीत होता. त्यामुळे विदेशी व्यापारातही वाढ झाली होती

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

Page No
Date

# इतर व्यापारी केंद्रे

विजयनगरच्या राज्यात अनेक बाजार पेठा होत्या विजयनगरच्या समृद्धीचे वर्णन परकीय प्रवाशांनी केले आहे. अनेक व्यापारी वस्तूंची दुकाने मोती माणके हिरे गुलाबाच्या फुला पर्यंत येथे व्यापार चाले. बिदनूर ही दुसरी बाजारपेठ धान्याच्या व्यापारासाठी प्रसिद्ध होती.

# मध्ययुगीन महाराष्ट्रातील व्यापार

पोर्तुगीज इंग्रज फ्रेंच डच यांच्या वखारी स्थापन झाल्याने तसेच समुद्रावरील त्यांचा प्रभाव लक्षात आल्याने छ. शिवाजी महाराजांनी सर्वात प्रथम आपले आरमार उभारले, रत्नागिरी बालकोट, दाभोळ, वेंगोरला, मालवन, चौल, कल्याण भिवंडी ही महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टीवरील मुख्य व्यापारी केंद्र होती. गोदावरी, कृष्णा, भीमा या नद्या काही काळा पुरत्याच जलवाहतुकीसाठी उपलब्ध होत देशातील माल समुद्रकिनारी व तेथे बंदरात आलेला माल देशावर घाटातुन बैल, उंट, रेडा गाढव बैलगाडी या साधना पासुन पाठवला जात. असत मालवाहतुकीसाठी जे बैल असत ते दररोज ३६ ते ६५ मैल अंतर पार करत।

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

Page No
Date

# आभार

2019 - 20 या शैक्षणीक वर्षा पासुन महाविद्यालयातील बी. ए. भाग 3 वर्गासाठी इतिहास अभ्यास या विषयांतर्गत विषय प्रकल्प करण्याची संधी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी उपलब्ध करून दिली. त्याबद्दल शिवाजी विद्यापीठ यांची मी ऋणी आहे.

विषय प्रकल्प करीत असताना विषय निवडीचे स्वातंत्र्य प्रत्येक प्रश्नासाठी योग्य मार्गदर्शन व वातल्याने प्रोत्साहन दिल्या बद्दल माननीय प्रा. श्री. धुमाळ. के. वाय मी आभारी आहे. या प्रकल्प विषया दरम्यान योग्य मार्गदर्शन करणारे आणि पूरक माहिती देणारे विषय

महाविद्यालयातील सर्व प्रा प्रशासकीय वर्ग यांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

Scanned with CamScanner